अस्सल सोलापुरी

# सुराज्य


सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

▸ वर्ष : २४ वे ▸ अंक : ११५ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२

www.surajyadigital.com । गुरुवार, दि. २२ जानेवारी २०२६ ।

# ए बी फॉर्म में वो भी फॉर्म में जो भी फॉर्म में




## २७ को पता चलेगा कौन कितना पानी में!

✔ सोलापूर/प्रतिनिधी

बंडखोरी टाळण्यासाठी भारतीय जनता पक्षाने एकाच ठिकाणी अनेक उमेदवारांना 'ए बी' फॉर्मची खिरापत वाटल्याने बुधवारी गोंधळ झाला. अधिकृत उमेदवारीबद्दल सभ्रमावस्था निर्माण झाली. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत २७ जानेवारी आहे तोवर सर्वच उमेदवारांना समाधान मानावे लागणार आहे. २७ तारखेलाच यातील अधिकृत कोण यावर शिक्कामोर्तब होणार आहे





## पंढपुरात विठ्ठल गटात मोठी फूट, पालकमंत्री जयाभाऊंची शिष्टाई

लक्षवेधी पंढरपुरात नेहमीच मोठ्या राजकीय घडामोडी घडत असतात. इथल्या नगरपरिषदेच्या निवडणुकीदेखील अनपेक्षित घडामोडी घडल्या होत्या. त्यांनतर जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांची निवडणुकीदेखील याला अपवाद ठरली नाही. या तालुक्यातील श्री विठ्ठल परिवारास भाजपनं सुरुंग लावला. या परिवरातील कल्याणराव काळे आणि गणेश पाटील या राष्ट्रवादीच्या दिग्गजांना भाजपनं गळाला लावलं. त्यांच्या कुंटुंबातील सदस्य रणरागिणींना भाजपचं अधिकृत उमेदवारी बहाल करुन आज गुरुवारीच वाडीकुरोलीत काळे आणि पाटील यांच्या पक्ष प्रवेशाचा सोहळा जाहीर करुन टाकला. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या ऐन धामधुमीत भाजपनं राष्ट्रवादीला फोडलं. यामध्ये पालकमंत्री जयकुमार गोरेंची शिष्टाई यशस्वी ठरत असल्याचं मानलं जात आहे.

## पंढरपुरात निवडणुकीचं वारं फिरलं; काळेंचं भाजपात कल्याण', पाटलांचा 'श्रीगणेशा!' मोनिका काळे आणि प्रफुल्लता पाटलांना दणक्यात उमेदवाऱ्या!!



'स्थानिक'च्या निवडणुका दोन्ही राष्ट्रवादीनं एकत्र येऊन लढण्याचा निर्णय घेतला, आमदार अभिजित पाटील यांच्या हाती या निर्णयाच्या अनुषंगानं, सुत्रं आली. राजकीय घडामोडी घडल्या. राष्ट्रवादीचे नेते कल्याणराव काळे आणि गणेश पाटील यांच्या उमेदवाऱ्यांचे दोर कापण्यात आल्याचं कळताच तातडीनं पक्षांतराची चक्रं फिरली. काळे आणि पाटील यांनी भाजपमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय दणक्यात घेऊन टाकला. पंढरपूर तालुक्यातून दोन तगडे चेहरे पक्षाला मिळताहेत हे चाणक्ष भाजपनं ओळखून काळे आणि पाटीलया दोघांच्या पक्ष प्रवेशाच्या बारशाच्या सोहळ्याचा गुरुवार (ता.२२) मुहुर्त काढून टाकला. तत्पूर्वी कल्याणराव काळे यांच्या भावजय आणि समाधान काळे यांच्या पत्नी मोनिका काळे यांना भाजपनं वाखरी गटासाठी एबी फॉर्म दिला. त्यांची भाजपकडून उमेदवारी दाखल झाली. दुसरीकडं गणेश पाटील यांच्या मातोश्री प्रफुल्लता पाटील यांनादेखील भाजपनं भोसे गटातून अधिकृत उमेदवारी दिली.

## वा रं पट्ट्या! पक्ष प्रवेशाआधीच उमेदवारीचा एबी' फार्म



जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांतर्गत उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या टप्प्यावर बुधवार (ता.२१) सोलापूर जिल्ह्यात नाट्यमय घडामोडी घडल्या. पक्षांतर अन् अचानक एबी फॉर्मसह उमदेवार पाहायला मिळाले. गेल्या कित्येक महिन्यांपासून भाजपात प्रवेश करणार असल्याची चर्चा असलेल्या प्रा. शिवाजी सावंत यांचा भाजप प्रवेश न होताच त्यांना उमेदवारी मिळाली आहे. त्यांच्या छातीवर अखेर कमळ लागलं असून जिल्हा परिषद निवडणुकांसाठी सुपुत्र पृथ्वीराज सावंतांना भाजपकडून उमेदवारी देण्यात आली आहे. पृथ्वीराज सावंत हे माढा तालुक्यातील मानेगाव जिल्हा परिषद गटातून भाजपच्या चिन्हावर निवडणूक लढवत आहेत.

## लक्षवेधी नोंदी...

- तडवळ गट : शिवानंद पाटलांना राष्ट्रवादीची उमेदवारी उर्वरित सर्व जागा शिंदेसेनेच्या पुढ्यात
- वागदरी गट : भाजपतर्फे सागर कल्याणशेट्टींची उमेदवारी
- पांडे गट : बागल गटाच्या नेत्या रश्मी बागलांची भाजपतर्फे उमेदवारी
- हत्तुर गट : इंदुमती अलगोंड भाजपच्या उमेदवारीवर आखाड्यात
- कामती बुद्रुक गट: विमल खताळ भाजप, अश्विनी पाटील (राष्ट्रवादी)
- फोंडशिरस गट : अर्जुनसिंह मदनसिंह मोहिते-पाटील यांचा अर्ज
- आष्टी गट : विजयराज डोंगरे (राष्ट्रवादी), मोहोन पाटील (भाजप)
- नरखेड गट: संतोष पाटील (शिवसेना), सोमेश क्षीरसागर (भाजप)
- पोखरापूर गट' : बालाजी नरुटे(भाजप), सर्जेराव निळे (राष्ट्रवादी श.प.)
- पेनूर गट : रामदास चवरे (भाजप),चरण चवरे (शिवसेना)
- कुरुल : सचिन जाधव, (भाजप), उमेश पाटील (राष्ट्रवादी)
- खंडाळी गट: सतिश भोसले (भाजप), सौदागर खडके (राष्ट्रवादी)
- भंडारकवठे गट : सविता उंबरजेंना भाजपकडून उमेदवारी

अधिक वृत्त पान १२ वर...




साधारण तब्बल आठ वर्षांच्या प्रदीर्घ प्रतिक्षेनंतर सोलापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या ६८ आणि पंचायत समित्यांच्या १३६ जागांसाठी येत्या ५ फेब्रुवारीला निवडणूक होत आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या बुधवार (ता.२१) शेवटच्या दिवशी जिल्हा परिषदेच्या ६८ गटासाठी ९४५ इच्छुक उमेदवारांनी अर्ज दाखल केले. तर पंचायत समित्यांच्या १३६ गणांसाठी १६५९ इतके उमेदवारी अर्ज दाखल झाले. या दाखल अर्जांवर आज गुरुवार (ता.२२) छाननी होणार आहे.दरम्यान उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत पडद्याआड आणि पडद्यावर प्रचंड मोठ्या राजकीय घडामोडी घडल्या. अनेक नाट्यमय घडामोडीतून मेंबर होण्यासाठी इच्छुकांनी उमेदवारीचं लॉगइन सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडं केलं.

उमेदवारी अर्ज मागे घेण्याची २७ जानेवारी ही अंतिम मुदत आहे. तोपर्यंत मोठी खलबतं होतील. उमेदवारी मागे घेण्यासाठी कोणाला पुनर्वसनाचे शब्द दिले जातील. उमदेवाऱ्यांवरुन अनेक बाराभानगडी घडतील. मात्र बुधवारी दाखल उमेदवाऱ्यांसदर्भात उशीरापर्यंत गुप्तता राहिली. 'त्या' 'त्या' तालुक्यांच्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडून माहिती उपलब्ध झाली नाही. त्यामुळं आखाड्यातील उमेदवाऱ्यासंदर्भात स्पष्ट माहिती समजली नाही. बंडखोरी टाळण्याच्या पार्श्वभूमीवर, भाजपनं एकाच ठिकाणी अनेक उमेदवारांना एबी फॉर्म दिले. त्यातून उमेदवारीसंबंधी संभ्रम निर्माण झाली. उमेदवाऱ्या गुलदस्त्यात राहिल्या. सोलापूर महापालिकेतील सत्ता हस्तगत करण्यासाठी भाजपची मोठी ताकद लावली होती. त्यानंतर आता सोलापूर जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील सत्ता आपल्या वर्चस्वाखाली आणण्यासाठी या पक्षानं मोठी मोर्चेबांधणी करत ताकद लावली आहे. त्याचं प्रत्यंत्तर दाखल उमेदवाऱ्यांमधून दिसलं.

जिल्ह्यात उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या पार्श्वभूमीवर, प्रमुख पक्षांसह इच्छुक उमेदवारांनी मोठं शक्तिप्रदर्शन केल्याचं दिसलं. अनेक तालुक्यात भाजपला टक्कर देण्यासाठी सर्वपक्षीय आघाडी करण्याचा प्रयत्न झाला. मात्र जागा वाटपावरुन आघाड्यांमध्ये बिघाडी झाली. जागा आणि उमेदवाऱ्या यांचा प्रचंड गोंधळ राहिला. विविध पक्षाचे नेते, पुढारी, पदाधिकारी तसेच आजी-माजी आमदार यांनी आपले सुपुत्र, सौंभाग्यवती तसेच नातवाईक यांच्या उमेदवाऱ्या दाखल केल्या. त्यातून घराणेशाहीचं दर्शन घडलं.

## 'दक्षिण'ला एका जागेवर अनेकांना 'एबी' फॉर्म; भाजपतर्फे अधिकृत उमेदवारीची 'दक्षिणा' कोणाला? याबद्दल औत्सुक्य

*दक्षिण सोलापूर तालुक्यात जिल्हा परिषदेच्या सहा आणि पंचायत समितीच्या १२ जागा आहेत. दरम्यान भाजपकडून एका जागेसाठी अनेकांना एबी फॉर्म देण्यात आले. त्यातून गोंधळ निर्माण झाला. नेमकी उमेदवारी कोणाला राहणार, हे उमेदवारी माघार घेण्याच्या दिवशी समजणार आहे. मात्र उमेदवारीवरुन पेच निर्माण झाला आहे. दिलेल्या एबी फॉर्मपैकी कोणाची उमेदवारी राहणार? यावरुन इच्छुक उमेदवारांसह त्यांचा समर्थकांचा टेन्स कायम राहिला आहे. हे सगळे ऑक्सिजनवर आहेत. बंडखोरी टाळण्यसाठी एका जागेवर अनेक एबी फॉर्म देण्याचा डाव भाजपनं टाकला आहे. या तालुक्यात भाजप विरुद्ध सर्वपक्षीय अशी निवडणूक होईल, त्या पार्श्वभूमीवर, जागा वाटप करुन उमेदवारी अर्ज भरले असल्याचं सांगण्यात आलं.*

## जंगी शक्तीप्रदर्शनातून आमदार अभिजित पाटलांच्या नेतृत्वाखाली अर्ज सादर



विठ्ठल कारखान्याचे अध्यक्ष आणि माढ्याचे आमदार अभिजित पाटील यांनी पंढरपूर तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या ८ आणि पंचायत समितीच्या १६ उमेदवारांचे अर्ज जंगी शक्तीप्रदर्शनातून सादर केले. राष्ट्रवादीचे नेते शरद पवार आणि अजित पवार यांच्या फोटोंच्या छबी उंचावूत हजारो समर्थक उमदेवारी अर्ज भरण्याच्या मिरवणुकीत सहभागी झाले होते. दोन्ही राष्ट्रवादीच्या एकत्रीकरणाच्या माध्यमातून हे उमदेवारी अर्ज भरण्यात आले.

# ये डर मुझे अच्छा लगा

✔ सोलापूर/प्रतिनिधी

सामान्यतः कोणत्याही महापालिकेत महापौर, स्थायी समिती सभापती आणि त्यानंतर उपमहापौर हे पदे प्रतिष्ठेचे आणि मानाचे समजले जाते. मात्र सोलापूर महापालिका याला ठळक अपवाद ठरत आहे. कारण येथे उपमहापौर पद स्वीकारणे म्हणजे जणू राजकीय आत्मघातच ठरत असल्याची भावना आता सर्वसामान्यांपासून राजकीय वर्तुळापर्यंत रूढ झाली आहे. आतापर्यंत सोलापूर महापालिकेत जे जे उपमहापौर झाले, त्यातील बहुतांशजण पुन्हा महापालिकेत कधीच परतलेले नाहीत. अनेकांचे तर राजकारण पूर्णपणे संपुष्टात आले आहे. त्यामुळे हे पद आता 'अपशकुनी', 'वादग्रस्त' आणि 'धोकादायक' समजले जाऊ लागले आहे. त्यामुळे यंदा हे पद कोण स्वीकारण याबाबत पालिका वर्तुळात चर्चा रंगली आहे.




## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




हे किती दिवस ऐकायचे !

| कल्याण |
|---|
| 334-06-150 |

| मुंबई |
|---|
| 279-80-190 |

## शहर मे तेरी जीत से ज्यादा चर्चे मेरे हार के है !

राज्यातील इतर महापालिकांमध्ये उपमहापौर पद ही पुढील राजकीय वाटचालीसाठी पायरी मानली जाते. मात्र सोलापूरमध्ये ही पायरी वर नेण्याऐवजी खाली ओढणारी ठरत असल्याचा अनुभव वारंवार आला आहे. आजवर एन. एम. वडवान, यल्लप्पा जेनुरे, माधवराव कौंतम, फजलेअहमद आडते, न्या.व्यं. पिट्टा, ल.आ. साठे, दीनानाथ एरम, प्रा. नसीम पठाण, म.ति. होसमनी, ह.ना. आसादे, त.मा. गंभिरे, ईस्माईल अल्लोळी, संगप्पा केंगनाळकर, लालसिंग रजपूत, नारायण कोनापुरे, बाळासाहेब घोंगडे, हबीब सय्यद, अभिमन्यू भोसले, वाय.एस. गायकवाड, सुषमा घाडगे, इस्माईल बागवान, फातिमा शेख, अरविंद काकडे, माणिकसिंग मैनावाले, प्रमोद गायकवाड, महानंदा भोसले, सुमन मुदलियार, अप्पाशा मेत्रे, पद्माकर काळे, दिलीप कोल्हे, राजेंद्र कलंत्री, विष्णू निकंबे, प्रवीण डोंगरे, राजेश काळे आदी मान्यवरांनी उपमहापौर पद भूषवले. मात्र यातील बहुतांश जणांना पुढील निवडणुकीत पराभवाला




## एका आमदार समर्थकांनी पद घेण्यास दिला नकार

आगामी काळात सोलापुरात तिन्ही आमदारांकडे महापौर, स्थायी समिती आणि उपमहापौर हे पद वाटून देण्यात येईल, अशी चर्चा आहे. मात्र यातील एका आमदारांच्या नगरसेवकांनी हे पद घेण्यास नकार दिल्याचे समजते.

सामोरे जावे लागले. महानंदा भोसले, सुमन मुदलियार, अप्पाशा मेत्रे, पद्माकर काळे, दिलीप कोल्हे, राजेंद्र कलंत्री, विष्णू निकंबे, प्रवीण डोंगरे, राजेश काळे, पिट्टा, होसमनी, घोंगडे, हबीब सय्यद, सुषमा घाडगे, लालसिंग रजपूत संगप्पा केंगनाळकर आदींनी पराभवाला सामोरे जावे लागले आहे. यातील अनेकांचे राजकारणही संपले आहे. गतवेळी उपमहापौर असलेल्या राजेश काळे यांचा कार्यकाळही वादांनी गाजला. इतकेच नव्हे, तर गतवेळीच्या माजी महापौर शशिकला बद्दल यांनाही यंदाच्या निवडणुकीत उमेदवारी देण्यात आली नाही. यामुळे सोलापूर महापालिकेचे उपमहापौर पद शापित असल्याची चर्चा सुरू आहे. यंदा भारतीय जनता पक्ष मोठ्या बहुमताने महापालिकेत सत्तेत आला असला, तरी उपमहापौर पद स्वीकारण्यास अनेक नगरसेवकांनी स्पष्ट नकार दिल्याची माहिती समोर आली आहे. काही इच्छुकांनी खासगीत हे पद घेतले की पुढची निवडणूक हरायचीच अशी भीती व्यक्त केली आहे.